www.sahyandrinews.com


Scan QR code to visit... Epaper Portal

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०८ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१२ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

**राजमाता जिजाऊ माँसाहेब**

जयंती निमित्त

विनम्र अभिवादन

–संपादक



**स्वामी विवेकानंद**

जयंती निमित्त

सर्वांना हार्दिक शुभेच्छा..

–संपादक

## शिवसेनेनंतर आता राष्ट्रवादीचा नंबर

# राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रतेप्रकरणी ३१ जानेवारीला निर्णय घेणार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर

**मुंबई**–महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे आता राष्ट्रवादी कोणाची याबाबात लवकरच निर्णय घेण्याची शक्यता आहे. अजित पवार यांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादीचे दोन गट पडले. या दोन्ही गटांनी याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांवर ३१ जानेवारीपर्यंत निर्णय देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे ३१ जानेवारीला राष्ट्रवादी आणि घड्याळ चिन्ह कोणाचे याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.राष्ट्रवादीच्या पक्ष आणि चिन्हाच्या लढाई संदर्भातील कार्यवाही ६ जानेवारीपासून सुरू झाली. आता येत्या १८ जानेवारीला किंवा त्यापूर्वी सर्व संबंधित पक्ष साक्षीदारांची यादी आणि शपथपत्रांची देवाणघेवाण करतील असे मानले जात आहे. २० जानेवारीला साक्षीदारांची उलटतपासणी, तर २३ जानेवारीला प्रतिवादींची उलटतपासणी होण्याची शक्यता आहे. तर अंतिम सुनावणी २५ जानेवारीला सुरू होईल आणि २७ जानेवारीला संपेल. त्यानंतर ३१ जानेवारीला अध्यक्षांना निर्णय देणे अनिवार्य असणार आहे.याबाबत बोलतांना राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे म्हणाले की, राष्ट्रवादीची परिस्थिती शिवसेनेपेक्षा वेगळी आहे. या प्रकरणात, प्रतिस्पर्धी गटांनी जारी केलेला व्हीप कायदेशीरदृष्ट्या वैध होता की



नाही, असा प्रश्न व्हिपच्या वैधतेबाबत आहे. आम्ही एनडीएच्या बैठकीत उपस्थित राहिल्यानंतर आमच्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली.दरम्यान, अजित पवार गटाने यापूर्वी निवडणूक आयोगात याचिका दाखल केली होती. अजित पवार यांना राष्ट्रवादीचे अध्यक्ष म्हणून मान्यता द्यावी आणि निवडणूक चिन्ह घड्याळ मिळावे, अशी मागणी अजित पवार गटाने निवडणूक आयोगात केली होती. शरद पवार गटाने देखील याचिका दाखल केली होती. निवडणूक आयोगाने सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेत आपला निर्णय राखून ठेवला आहे. आता याबाबतचा निवडणूक आयोगातील निकाल कोणत्याही क्षणी येण्याची शक्यता आहे.राष्ट्रवादी कोणाची, पक्षावर दावा कुणाचा यावर निवडणूक आयोगात सुनावणी सुरु आहे. अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात भूमिका मांडण्यात आली आहे. अजित पवार आणि शरद पवार गटाचा एकमेकांवर बनावट शपथपत्रं सादर केल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रवादी पक्षाची स्थापना शरद पवारांनी केली, मग त्यांच्याशिवाय पक्ष कसा काय असू शकतो असा सवाल शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी उपस्थित केला आहे. तर सुप्रिया सुळे यांच्या कार्याध्यक्षपदाची नियुक्ती चुकीची असल्याचा युक्तिवाद अजित पवार गटाकडून आतापर्यंत करण्यात आला आहे.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरोधात २० जून २०२२ रोजी बंड करणाऱ्या एकनाथ शिंदेंसह १६ शिवसेना आमदारांविरोधात दाखल अपात्रतेची याचिका बुधवारी तब्बल १८ महिन्यांनंतर निकाली निघाली. शिवसेनेची अवैध पक्षघटना, नेतृत्वाचे अधिकार आणि विधिमंडळातील बहुमत या तीन मुद्द्यांच्या आधारे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एकनाथ शिंदे व समर्थक आमदारांना क्लीन चिट दिली. त्यानंतर आता राष्ट्रवादीबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राज्यात थंडीत होणार वाढ : विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात गारठा वाढणार

**पुणे**–राज्यात थंडीचा जोर पुन्हा वाढणार आहे. पश्चिमेतून येणाऱ्या वाऱ्यांमुळे राज्यात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. मात्र आजपासून पावसाचे प्रमाण एकदम कमी होऊन आणि थंडीचा कडाका वाढेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तर राज्यातील बहुतांश भागांमध्ये हवामान कोरडे राहिल. त्यामुळे थंडीत वाढ होण्याची शक्यता आहे.दरम्यान, राज्यात ढगाळ हवामानासह किमान तापमानातील वाढ कायम राहण्याचा अंदाज आहे. तसेच पहाटेच्या वेळी धुक्याची चादर पाहायला मिळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. राज्यात सध्या अनेक ठिकाणी ढगाळ हवामान झाले असून, पहाटे कमालीचा गारठा जाणवत आहे.राज्यातील बहुतांश भागात बुधवारीही पावसाने हजेरी लावली. कोकणात आणि खासकरुन रत्नागिरीमध्ये पाऊस झाला. तर मध्य महाराष्ट्र आणि नगरमध्ये ७.८ मीमी पावसाची नोंद झाली. या शिवाय मराठवाड्यातील काही जिल्ह्यांतही पावसाने हजेरी लावली. विदर्भ, अकोल्यात ०.२ तर नागुपरात ०.३ मीमी पावसाची नोंद झाली.

## वरोऱ्यात रंगणार डब्ल्यूएसएफ चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा

**वरोरा | प्रतिनिधी**

वरोरा स्पोर्टस फाउंडेशन वरोरा (डब्ल्यूएसएफ)व लोकशिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा पुरुष गट व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन लोकशिक्षण संस्थेमधील व्हॉलीबॉल या खेळाला ५१ वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल लोकमान्य महाविद्यालय, वरोरा (स्व. मनोहरभाऊ पाटील क्रीडा परिसर) येथे दिनांक १ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान डब्ल्यूएसएफ चषक व्हॉलीबॉल स्पर्धा दिवस- रात्र पद्धतीने आयोजित करण्यात आलेली आहे.

स्पर्धेकरिता चार मैदाने सज्ज करण्यात आलेली असून तीन मैदानावर विद्युत प्रकाश झोताची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील किमान ३२ जिल्हा संघ सहभागी होतील. वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा व लोकशिक्षण संस्था वरोडाचे यशस्वीपणे सलग सातवे आयोजन असून यानिमित्ताने वरोरा शहरात ३८० खेळाडू व ८० पदाधिकारी, पंच, प्रशिक्षक स्पर्धेच्या निमित्ताने दाखल होणार आहे. क्रीडा रसिकांसाठी ही स्पर्धा अभूतपूर्व मेजवानी ठरणार आहे.वरोरा स्पोर्टस फाउंडेशन व लोक शिक्षण संस्थेचे खेळाडू सतत दरवर्षी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करतात. त्याचप्रमाणे सतत सलग राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. उद्घाटन प्रसंगी गडचिरोली जिल्हा क्रीडा अधिकारी प्रशांत दोंदल यांचा सपत्निक सत्कार करण्यात येणार असून स्पर्धेचे उदघाटन वरोरा विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंग परदेसी ( आयपीएस) हे असणार आहे. स्पर्धेचे स्वागताध्यक्ष लोक शिक्षण संस्था वरोडा चे अध्यक्ष प्रा.श्रीकांत पाटील असून मुख्य पाहुणे म्हणून राजाराम बापू पाटील साखर कारखाना इस्लामपूर जिल्हा सांगलीचे चेअरमन व महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष प्रतीक जयंत पाटील हे असणार आहे. पाहुणे म्हणून वरोरा चे माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, प्राचार्य अशोक जीवतोडे सचिव,चांदा शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर, लोकशिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळपाटील ,वरोराच्या उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम (आयपीएस), नागपूर विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, मुकेश जीवतोडे शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा) , डॉ. कपिल गेडाम न्यूरोलॉजिस्ट चंद्रपूर ,सामाजिक कार्यकर्ते किशोर टोंगे, एक्सलंट अकॅडमीचे संचालक अभय टोंगे, ड. गजानन बोढाले, स्पर्धा यशस्वी करण्याकरिता वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा (डब्ल्यूएसएफ) चे अध्यक्ष गजानन जीवतोडे, किशोर पीरके, सुनील बांगडे , विनोद उंमरे, गोपाल नरोले, महाराष्ट्र वॉलीबॉल संघटनेचे सचिव विरल शहा व सर्व सहकारी प्रयत्न करीत आहेत.

## सत्ता संघर्षाच्या निकालानंतर गोंडपिपरीत (शिवसेना)ठाकरे गट आक्रमक

### केंद्र व राज्यसरकारचा निदर्शने करत निषेध आंदोलन

**गोंडपिपरी | प्रतिनिधी**

राज्यातील सत्ता संघर्षावर निकाल देताना शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निर्वाळा विधानसभा अध्यक्षांनी दिला.अपात्र प्रकरणाच्या निकालावर गोंडपिपरीत शिवसेना(ठाकरे) पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शिवाजी चौकात संताप व्यक्त करत निदर्शने केले.

मूळ प्रकरण हे अपात्रतेचे होते.पण राहुल नार्वेकर यांनी कोणालाच अपात्र केले नाही.शिवसेना(ठाकरेंची)घटना ग्राह्य धरली नाही तर आमदार अपात्र का नाही..? पक्षाची घटना चालत नाही तर एबी फॉर्म कसा चालला.गोगावले चां व्हीप योग्य तर कुणीच अपात्र कसे नाही.नार्वेकराणी दिलेला निर्णय लोकशाहीची हत्या आहे.शिवसेना कुणाची लहान मुलंही सांगू शकतात.अशा भावना व्यक्त करत विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र सरकार व दडपशाही करणाऱ्या केंद्रसरकार विरोधात (ठाकरे) गट आक्रमक होत जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांच्या मार्गदर्शनात जिल्हा उपप्रमुख संदीप करपे यांच्या




उपस्थितीत.शिवसेना तालुकाप्रमुख सुरज माडूरवार यांच्या नेतृत्वात आंदोलन करत दिलेल्या निकालाचा दि.(११) गुरुवारी दुपारी १ वाजता निषेध करण्यात आला.

यावेळी तालुका संघटक शैलेश बैस,शहर प्रमुख रियाज कुरेशी,युवासेना तालुका प्रमुख तुकाराम सातपुते,शहर उपसंघटक अशपाक कुरेशी,तालुका उपसंघटक नरेंद्र इंगोले, बब्बु पठाण,बळवंत भोयर,युवासेना तालुका उपप्रमुख गौरव घुबडे, तमुस अध्यक्ष संदीप लाटकर,जोगापुर शाखा प्रमुख पंकज डांगी,आकसापुर शाखा प्रमुख दर्शन वासेकर.पेलुर शाखा प्रमुख स्वप्निल नागापूरे, तारसा शाखा प्रमुख अमोल कुकुडकर,विपिन मोरे,सुधीर अवथरे,वढोली शाखा प्रमुख राहुल मेकरतीवार, श्रीधर मुंजनकर,विशाल वाघाडे, डवोकेट उराडे,नबात सोनटक्के,प्रदीप देवाडे,कार्तिक बटे,छोटू अलोने,भगवान आभारे,धनराज पिपरे,अमित नेवारे,राहुल चांदेकर,मयुर चिचघरे, इंद्रपाल वासेकर,समीर सातपुते,साहिल वासेकर,लोकेश सिडाम,युवराज बुरांडे,रोहित कोडपे,दीपक कुळमेथे यांच्यासह शेकडो पदाधिकारी शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मूल तालुका सचिव पदावर प्रशांत मेश्राम यांची नियुक्ती



**मूल | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय सचिव आ.राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर येथे झालेल्या बैठकीत प्रगतशील शेतकरी म्हणुन ओळख असलेल्या प्रशांत मेश्राम यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या मूल तालुका सचिव पदावर आ.राजेंद्र जैन आणि जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली.मूल तालुक्यातील मारोडा या गावचे राहिवासी असलेल्या प्रशांत मेश्राम यांची परिसरात अत्यंत युवा प्रगतशील शेतकरी म्हणुन ओळख आहे. सतत ते शेतकऱ्याच्या संपर्कात राहून आधुनिक शेती करण्यासाठी प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करीत असतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी त्यांना तालुका सचिव पदाची महत्वाची जबाबदारी देत त्यांना शेतकऱ्यांचे प्रश्न आणि जणसामान्यांचे प्रश्न आणि विधायक कामे सोडविण्याची संधी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली. त्याच्या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला मारोडा परिसरात जनतेचा भक्कम पाठिबा मिळेल अशा चर्चा जनतेतून उमटत आहेत.त्यांनी आपल्या नियुक्तीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर,तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांना दिलें असुन त्यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष आकाश येसनकर,महिला अध्यक्ष संगीता गेडाम,धारा मेश्राम,आनंदराव गोहने,शैलेश निमगडे,वासुदेव पिपरे,दामोधर सोनुले यांनी अभिनंदन केले आहे.

## 'चेन्ना' प्रकल्पासाठी माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा पुढाकार

### वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

**गडचिरोली | प्रतिनिधी**

मागील ४० वर्षांपासून रखडलेला आणि मुलचेरा तालुक्यासाठी वरदान ठरू पाहणाऱ्या चेन्ना सिंचन प्रकल्पाची समस्या मार्गी लावण्यासाठी माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी पुढाकार घेतला असून नुकतेच वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथील हरिसिंग सभागृहात विविध विभागांची बैठक पार पडली.१३ मे १९७७ रोजी १.८२ कोटींच्या चेन्ना सिंचन प्रकल्पाला मान्यता मिळाली होती.या प्रकल्पामुळे येथील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार होता.१९८०-८१ पर्यंत या प्रकल्पाचे जवळपास ७० टक्के काम झाले होते.त्यांनतर वनकायद्याचा अडथळ्यामुळे बांधकाम ठप्प पडले.२०१४ मध्ये केंद्र आणि राज्यात भाजप सत्तेत आल्यावर वनविभागाकडून एफएआर प्रमाणपत्र मिळाल्यावर या सिंचन प्रकल्पाची समस्या मार्गी लागणार अशी आशा होती. मात्र,चेन्ना सिंचन प्रकल्पाची समस्या काही सुटली नाही.त्यामुळे पुन्हा एकदा माजी राज्यमंत्री



राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी मुलचेरा येथील शिष्टमंडळ घेऊन नागपूर गाठले आणि वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांची बैठक पार पडली.त्यात चेन्ना प्रकल्प पूर्णत्वास आणण्यासाठी सकारात्मक चर्चा करण्यात आली असून वन विभाग पूर्णपणे सहकार्य करणार असून पाहिजे ती निधी उपलब्ध करून देणार मात्र,सिंचन विभागाने पुढाकार घ्यावे असे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.पुढच्या आठवड्यात उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात महत्वाची बैठक संपन्न होणार असून हा प्रकल्प मार्गी लागणार अशी पुन्हा एकदा आशा निर्माण झाली आहे.वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम,वनविभागाचे प्रधान सचिव नरेश झुरमारे,सिंचन विभागाचे एसी रामटेके,गडचिरोलीचे वन संवरक्षक रमेश कुमार,आलापल्ली वन विभागाचे उपवनसंरक्षक राहुल सिंह टोलिया, चामोर्शीचे उपविभागीय अधिकारी उत्तम तोडसाम,मुलचेराचे तहसीलदार चेतन पाटील तसेच बंगाली आघाडीचे विदर्भ प्रभारी दीपक हलदार,भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश दत्ता, शैलेंद्र खराती,भाजपचे मुलचेरा तालुकाध्यक्ष संजीव सरकार,भाजपचे जिल्हा सचिव बादल शहा,तालुका महामंत्री सुभाष गणपती,बंगाली आघाडी जिल्हा सरचिटणीस बिधान वैद्य,विजय बिश्वास,बेपारी,आदी उपस्थित होते.

# चला झाडे लावूया, निसर्गाचे संतुलन राखुया!

**वृक्ष आणि मानव यांच्यातील नाते अद्वितीय आहे. माणसाला जेवढी जगण्यासाठी अन्न. वस्त्र, निवारा आणि पाणी यांची गरज असते. त्यापेक्षा किंबहुना त्याहीपेक्षा अधिक प्रमाणामध्ये ऑक्सिजनची गरज असते. झाडांच्या सावलीची गरज असते. मानवजातीला ऑक्सीजन आणि सावली या गोष्टींचे महत्त्व 'जावे ज्याच्या वंशा, तेव्हा कळे'असे म्हणतात. मानवी जीवनात एखादी गोष्ट फुकट मिळत असली की त्या गोष्टीचे तितकेसे महत्व वाटत नाही. सहज उपलब्ध होणाऱ्या गोष्टीचे मोल राहत नाही. आपल्या आयुष्यभरात आपण या सृष्टीतून कितीतरी प्रमाणामध्ये ऑक्सिजन घेत असतो. वृक्षांपासून मोफत मिळणाऱ्या या ऑक्सिजनचे महत्व आपल्याला किंचितही वाटत नाही. कारण निसर्ग ते आपल्याला फुकट उपलब्ध करून देतो. जिये एखादी गोष्ट फुकट आणि सहज मिळते तिथे त्या गोष्टीचे महत्त्व नसते. मानवी जीवनात ऑक्सिजनचे काय महत्त्व आहे? हे जर जाणून घ्यायचे असेल तर एखाद्या दवाखान्यामध्ये भरती झालेल्या पेशंटला विचारा. ज्याच्या नाकात कृतीम ऑक्सिजन नळी सिलेंडर लावलेला असतो. जेव्हा पेशंट दवाखान्यात जातो आणि फुकट मिळणारा ऑक्सिजन हजारो रुपये खर्चून विकत घेतो. तेव्हा या ऑक्सिजनचे महत्त्व आपल्याला कळते. लाखो, करोडो रुपयांचा ऑक्सिजन फुकट वापरणारे आम्ही या दवाखान्यात जाईपर्यंत अनभिज्ञ असतो.**




डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२
e sahyandrinews@gmail.com

ऑक्सिजन हा सजीव सृष्टीचा श्वास आहे त्याचे सवर्धन केले पाहिजे तो ज्या गोष्टीपासून मिळतो ते म्हणजे विविध प्रकारची झाडे. म्हणून झाडांचा आणि माणसाचा अतिशय निकटचा संबंध आहे. तुकाराम महाराजांनी झाडांना 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे' असे म्हणत या वृक्षांचे महात्म्य वर्णन केले आहे. झाडाचे संबंध सोयरीकीच्या नात्यात जोडले आहे. संबंध कथन केले आहे. मानवी जीवन सुखकर जगण्यासाठी जेवढे नातेवाईक आणि मित्रमंडळी आवश्यक आहेत. तेवढेच किंबहुना त्यापेक्षा काकणभर जास्तच वृक्ष हे मानवी जीवनात आवश्यक आहे.

परंतु अलीकड़े आपग या वृक्षांना विसरत चाललो आहोत. झाडाचे महत्व आपण गौणत्त्वाकडे नेत आहोत ही चांगली गोष्ट नाही. अलीकडे सृष्टीचे चक्र बदलून गेले आहे. वेळीअवेळी सुरू झाले आहे. कधीही पावसाळा, कधीही उन्हाळा, कधीही हिवाळा येतो आणि जातो कळत नाही. पूर्वी निसर्गाच्या नियमित चलनामुळे उरलेल्या नियमित काळात हे तीनही ऋतू हजेरी लावायचे .परतु आता निसर्गाचे चक्र बदललेले आहे. कधी उन्हाळा येतो. कधी पावसाळा येतो कळेनासे झाले आहे. पृथ्वीचे चक्र सगळं उलटसुलट झाले आहे. याला काही प्रमाणामध्ये मानवजातही




कारणीभूत आहे. त्याहीपेक्षा शासन जास्त प्रमाणात कारणीभूत आहे असे वाटते. या वाढणाऱ्या तापमानावर आळा घालायचा असेल तर वृक्षलागवड आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. शासनाने जर मनामध्ये आणले आणि त्याची प्रामाणिक अंमलबजावणी केली तर शासनाला हे काम सहज साध्य आहे. वृक्ष लागवडीच्या माध्यमातूनच मानवजातीचे भवितव्य आपण निश्चितच सुकर करू शकतो. परंतु या राज्यकर्त्यांना सांगणार कोण? ज्या राज्यकर्त्यांच्या निर्णयावर मानवी जीवन स्थिरस्थावर होणार आहे तेच राज्यकर्ते वृक्ष लागवडीपासून अनभिज्ञ आहेत. ज्या प्रमाणात झाडे तोडतो त्याच मानकाने त् आपण झाडे का लावत नाही? त्या हक्काने शासन वृक्षकटाई थोपवत का नाही?

याला जबाबदार कोण? म्हणून लोकहितवादी शासनाने वृक्ष लगवडीसाठी नागरिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. रस्त्यारस्त्यांवर महाकाय वृक्ष लावणे आणि त्याचे संवर्धन करणे ही काळाची गरज झालेली आहे. असे जर झाले नाही तर पुढे येणाऱ्या काळात निसर्ग माणसाला कधीही माफ करणार नाही. आपण निसर्गाला जणू ओरबाडून काढण्याचे काम थांबवले पाहिजे. अवेध वृक्षतोड करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. आयुष्यात जेवढी झाडे तोडली त्यापेक्षा दुपटीने झाडे लावली आणि जगवली तरच मानव जातीचे भवितव्य सुरक्षित आहे. अन्यथा वृक्षांविना मणसांचे भवितव्य काय राहील? है सांगायला कुठल्याही ज्योतिषाची गरज नाहीं. जे वृक्ष आपल्याहा शुद्ध आणि गार हवा देतात शुद्ध ऑक्सिजन देतात. प्रेमाची सावली देतात .फळे देतात. फुले देतात. औषधी देतात. अशा वृक्षांवर प्रेम करून आपण संत तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हे विधान प्रत्यक्ष जीवनात सार्थ ठरतेण्यासाठी सर्व जातीधर्म पंथीयांनी प्रयत्न करण्याची नितात आवश्यकता आहे. ती प्रामाणिकपणे राबवली तरच येणारा काळ सुकर आहे. दिवसेंदिवस पृथ्वीचे तापमान वाढतच आहे. मानवी शरीराला सहन न होणारे उष्णतामान वाढतं आहे. भविष्यात मानवी शरीराला सहन होणार नाही इतके उष्णतामान वाढेल अशी भीती वर्तविली जात आहे. तेव्हा शासनाने वृक्षलागवडी संदर्भात गंभीर झाले पाहिजे. वृक्ष लागवडीचे ध्येय ठरवून त्यात हा मुद्दा गांभिर्याने घेतला पाहिजे. साऱ्या गोष्टी शासनच करेल. आपण हात बांधून राहू हा विचार न करता प्रत्येक नागरिकांनीही शक्य तितकी झाडे लावण्याचा आणि ती जागवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वृक्ष लागवड ही केवळ फोटोसेशन व सोशल मीडिया पुरता इव्हेंट न ठरता त्याचे संवर्धन है गांभीर्याने घेतले पाहिजे. अनेकदा केवळ फोटो काढण्यापुरते वृक्ष लावले जातात आणि वृक्ष लागवडीची नौटंकी केली जाते. परंतु आता वाढत्या तापमानाचा विचार करता सर्वांनी गांभीर्याने गंभीर होत वृक्ष लागवडीचा मुद्दा मनावर घेणे आवश्यक आहे. घरातील एखाद्या लाडक्या लेकराबाळांप्रमाणे झाडांना जगवणे है माननी जीवनासाठी आवश्यक झाले आहे. कारण 'जान है तो जहान है' असे म्हणतात बदलत्या तापमानात उद्या मानवजातीने

ज्या गोष्टी प्रामाणिकपणे जपायला पाहिजे, त्या गोष्टी प्रामाणिकपणे राबविल्या जात नाहीत. अनेकदा त्या केवळ कागदावर राबविल्या जातात. त्यात प्रामाणिकता असती तर आजची विदारक परिस्थिती निर्माण झाल्याचे आपल्याला दिसले नसते. अलिकडे उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये टेम्परेचर वाढलेले तापमान अतिशय चिंतेची बाब आहे. या वाढलेल्या तापमानातूत अतिशय बाईट अस्थेत आपण जीवन जगत आहोत. बाढत्या तापमानाने माणूस बेजार झाला आहे. पांढरपेशा समाजाचे असू द्या परंतु जो समाज गरीब आहे. कष्टकरी आहे. त्यांना या उन्हाच्या झळा किती कष्टदायकपणे सहन कराव्या लागतात हे 'जावे ज्याच्या वंशा तेव्हा कळे' या म्हणीप्रमाणे झाले आहे. सूर्यास्तानंतर अंधार पडला तरी जमिनीची धूप थांबत नाही. गरमीने जीवन कासावीस होते. त्यामुळे गरिबांचे जीवन दुष्कर झालेले आहे. घरात इलेक्ट्रिसिटीचे बिल भरायला पैसा नाही, राहायला घर नाही अशा गोरगरिबांसाठी वृक्ष हे वरदान ठरत आहे. झाडाची सावली अमृतासमान उरते. जेव्हा एखाद्या कार्यक्रमात आपण दुचाकी चारचाकी घेऊन जातो. तेव्हा ते वाहन उभे ठेवण्यासाठी आपण सर्वप्रथम शोधतो ते एखादे झाड. एखादे झाड दिसले रे दिसले की त्याखाली आपण आपले वाहन उभे करतो.

हेतू हाच की तिथे वाढत्या उन्हामुळे तापमानामुळे बाहन गरम होऊ नये. किती काळजी होतो आपण त्या निर्जीव वस्तूची. त्याच ठिकाणी मुकी जनावरे व गरजवंत माणसे सुद्धा थांबतात. ज्या हक्काने आपण या साऱ्या गोष्टी करतो. त्या हक्काने आपण झाडांच्या लागवडीकडे लक्ष का देत नाहीं, दरम्यानच्या कालावधीमध्ये शासनाने लाखो झाडे लावण्याचा दावा केला. झाडे लावल्या गेली असे म्हणतात. मग लावलेली ही झाडे गेली कुठे? ती रस्त्यावर किंवा मैदानात दिसत का नाही? याचा अर्थ शासनाची वृक्षालागवड ही बोगस होती! त्या योजनेची अंमलबजावणी प्रामाणिकपणे झाली असती तर कदाचित आज चित्र वेगळे दिसले असते. रस्त्यावर पांथस्तांना आणि सगळ्या लोकांना झाडाची सावली शोधण्याची गरज नसती. जिकडे तिकडे हिरवळच हिरवळ दिसली असती. पण दुर्दैवाने म्हणा किंवा आपले नशीब वाईट आहे म्हणून म्हणा, शासन सुद्धा वृक्षलागवडी संदर्भात पाहिजे तेवढेगंभीर नाही. भीषण युगाकडे आपली वाटचाल सुरू झाली आहे. बाढत्या तापमानामुळे मानव जातीचे भविव्य गंभीर होत चाललेले आहे. आपल्याला झाडांचे महत्व, वृक्ष लागवडीचे गांगीर्य कळत नाही ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. भविष्यात मानवी जीवन बाचवायचे असेल तर आपल्याला वृक्ष लागवडीची नितांत आवश्यकता आहे. युद्धपातळीवर शासनाने एखादी पंचवार्षिक योजना केवळ आणि केवळ वृक्ष लागवडीसाठी राबवून तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी करायला पाहिजे. समर्पित भावनेने मानव जातीच्या संर्धनासाठी वृक्ष लागवड हाच पर्याय उरलेला आहे. आता आपण ती किती गांभीर्याने घेतो यावर सारे अवलंबून राहील.


# युगनिर्मात्या आईसाहेब आणि प्रज्ञावंत सुपुत्र

एका महान मातेची आणि एका देदीप्यमान सुपुत्राची आज जयंती! युगनिर्मात्या आईसाहेब जिजाऊ आणि प्रज्ञावंत सुपुत्र स्वामी विवेकानंद या दोन्ही महान विभूतींना जयंती निमित्त शत शत नमन! हा अतिशय आनंददायी योग आज जुळून येतांना संपूर्ण भारतासाठी निश्चितच हा गौरवपूर्ण दिवस! सतराव्या शतकात जन्मलेल्या जिजाऊ आईसाहेब ह्या इतिहासातील सुवर्णपान आहेत तर त्यांच्या नंतर एकोणिसाव्या शतकात जन्मलेले स्वामी विवेकानंद हे तर्कशास्त्र-तत्वज्ञान याचं आढळ अधिष्ठान आहेत. एका मातेनं आपल्या शूरवीर विचारांनी रयतेचे राज्य स्थापन करतांना छत्रपती शिवाजी महाराजांसारखं नररत्न घडवलं तर स्वामीजींनी जगभर फिरून भारतीय मुलभूत तत्वज्ञानाची ओळख संपूर्ण जगाला करून दिली. आज एकाच दिवशी एका महान माता-सुपुत्रांचा गौरव ही आम्हा भारतीयांसाठी मोठी अभिमानाची गोष्ट!मातेच्या दैदिप्यमान कर्तृत्वाने आणि सुसंस्कारित पालन पोषणाच्या बळावर अनेकविध सुपुत्रांनी आकाशाला गवसणी घालण्याचे भव्य-दिव्य कार्य केल्याचा इतिहास सर्वसाक्षी आहे!

छत्रपती शिवबांसारखे पुत्ररत्न घडवून आपल्या सर्वांगीण संस्काराने ज्या मातेने स्वबळावर रयतेचे साम्राज्य उभे केले अशा राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांचा इतिहास सुद्धा तेवढाच भव्य-दिव्य आहे! बालवयात वेरुळच्या भोसले घराण्यातील शहाजीराजे भोसले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संघर्ष जिजाऊंच्या पाचवीलाच पुजला होता. जाधव-भोसले यांच्यात बेबनाव झाला. दुर्दैवाने दोन्ही घरात प्रचंड वितुष्ट आले, परिणामी जिजाऊंचे माहेर कायमचे तुटले, परंतु न डगमगता त्यांनी शहाजीराजे भोसले यांचा संसार उजळवून टाकला. जिजाऊंसमोर अनंत अडचणींचे पहाड उभे होते. त्यातच शहाजी राजांना पुणे परगणा सोडून बंगळूरूला जावे लागले. जेष्ठ पुत्र संभाजींनी आपल्या वडिलांना भक्कम साथ दिली तर इकडे जिजाऊंनी शिवबांना मजबूत-तल्लख बनवले. मुघलशाही-कुतुबशाही-आदिलशाही-निजामशाही या बलाढ्य शाह्यांशी चार हात करण्याचे शारीरिक-मानसिक सामर्थ्य शिवबामध्ये निर्माण केले. काळ मोठा खडतर होता. गाढवांचा नांगर फिरलेल्या पुण्याच्या भूमीत अठरापगड जातीतील मावळ्यांच्या साथीने सोन्याचा नांगर फिरविण्याचे महत्कार्य आईसाहेबांनी केले! शूर-धाडसी-पराक्रमी मातेचे बाळकडू लाभलेल्या शिवबांनी वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला काबीज करून स्वराज्याचे तोरण बांधले आणि नंतर मागे वळून पहिलेच नाही!

एकावर एक आक्रमणे, शह-काटशहांनी जीवन व्यस्त-त्रस्त होत असतांना शिवबांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभे राहिल्या! युद्ध आणि व्यवहारकुशलतेने सूक्ष्म निरीक्षण-परीक्षण-मार्गदर्शन करण्याचे महत्वपूर्ण कार्य मांसाहेबांनी केले. विजापुर-मुघलसाम्राज्याशी संघर्ष, अफजलखान प्रकरण, पन्हाळगडचा वेढा, पावनखिंड लढाई, शाहिस्तेखान प्रकरण, सुरतची लुट, पुरंदरचा तह, आग्रा प्रकरण, मुघलांसोबत तह, उमराणी-नेसरीची लढाई आणि छत्रपती शिवबांचा राज्याभिषेक या सर्वच घटना सर्वसामान्यांचे डोळे दिपवून टाकणाऱ्या आहेत आणि या पाठीमागे खंबीर मार्गदर्शन कुणाचे असेल? तर ते मातोश्री जिजाऊंचे! जिजाऊंनी केवळ स्वराज्यच उभे केले नाही तर आपल्या मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची जिद्द निर्माण केली! छत्रपती शिवबांनी केलेले कार्य हे केवळ शक्तीचे कार्य नसून त्यामागे प्रचंड बुद्धिचातुर्य होते हे लक्षात घ्यावे लागेल. जात-धर्म-पंथ याचा संकुचित विचार कधी कुणाला शिवला नाही. सामान्यातील सामान्य आणि शिवबा समान मानून स्वराज्याची बांधणी माता जिजाऊंनी मोठ्या धीरोदत्तपणे केली आणि घराघरांत जाज्वल्य आत्मविश्वास पेरण्याचे महत्कार्य केले! याचाच परिणाम म्हणजे लोक स्वराज्यासाठी स्वतःचा जीव द्यायला तयार झाले! जीवा महाला, शिवा काशिदांसारख्या अनेकांनी हसत बलिदान दिले आणि त्यावर 'बहुजन हिताय' शिवबांनी आपल्या राजमुद्रेसह रयतेचे मराठी स्वराज्य संस्थापित केले!

तसेच आज एक दैदिप्यमान व्यक्तिमत्व, तेजोमय ब्रह्मचर्य, अमोघ वाणी आणि ज्ञान-ध्यान-साधनेने ओतप्रोत लेखणीच्या सामर्थ्यावर जगाला आपली ओळख निर्माण करणारे नरेंद्र नाथ दत्त म्हणजेच स्वामी विवेकानंद जयंती म्हणजेच राष्ट्रीय युवक दिन! त्यांनी शिकागो जागतिक धर्मपरिषदेत बंधू-भगिनींनो शब्दांनी संपूर्ण जगाला भारताच्या





वसुधैव कुटुंबकम तत्वाची ओळख करून दिली. जेमतेम ३९ वर्ष आयुष्य लाभलेले स्वामीजी म्हणजे ते चालते ज्ञानाचे बिंब।तयाचे अवयव ते सुखाचे कोंब! रामकृष्ण परमहंस यांच्या गुरुतत्व स्पर्शाने स्वामीजी अध्यात्मिक-वेदांत दर्शनाने ओतप्रोत व्यक्तिमत्व बनले! नैष्ठिक ब्रह्मचर्य, बलोपासना, ज्ञानसाधना, ध्यान धारणा, आत्मसन्मान, आत्मभान, आत्मविश्वास या सद्गुणांच्या बळावर मनुष्य आकाशाला गवसणी घालू शकतो हे सिद्ध केले. धार्मिक अवडंबर, ब्राह्मण्यवाद, पुरोहीतवाद, धर्माचे बीभत्स प्रदर्शन याला परखड विरोध करतांना ईश्वर मंदिरात नसून तो माणसामाणसात आहे ही वृत्ती म्हणजेच खरा हिंदू धर्म होय! असे स्वामीजी प्रतिपादन करत. स्वामीजींनी अजीवन युवकांना प्रेरित केले! उठा, जागे व्हा. स्वतः उठा आणि इतरांना उठवा. मनुष्यजन्म सुफळ करा आणि आपले ध्येय्य साध्य होईपर्यंत थांबू नका! हे स्वामीजींचे शब्द म्हणजे तरुणांपासून ते शंभर वर्षाच्या माणसाने जीवनात अंगिकारण्यासारखे आहेत! युवकांमध्ये नित्य स्फुल्लिंग चेतविण्याचे महत्कार्य स्वामीजींनी केले. बलदंड देहयष्टी, दैदिप्यमान-विद्वत्प्रचुर व्यक्तिमत्व, अंगावर भगवे वस्त्र, फेटा परिधान केलेले स्वामीजी म्हणजे दिव्यत्वाची प्रतीती! अल्पायुष्यात जगभर व्याख्याने, प्रचंड लेखन यातून अध्यात्म-विद्या और भारतीय दर्शन के बिना विश्व अनाथ हो जायेगा असे प्रतिपादन करून स्वामीजींनी भारताच्या ज्ञान समृद्धीला झळाळी दिली. स्वामी विवेकानंद केवळ संत नव्हते तर ते एक महान देशभक्त, विचारवंत, वक्ता, लेखक आणि मानवप्रेमी व्यक्तिमत्व होते! शिक्षण म्हणजे ज्यातून विद्यार्थी शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकसित झाला पाहिजे. शिक्षणातून चरित्र-चारित्र्य घडले पाहिजे. मन-बुद्धी विकसित होऊन विद्यार्थी आत्मनिर्भर बनला पाहिजे. आचरण-संस्कारसंपन्न शिक्षण गरजेचे आहे. शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ असावे. शिक्षक अत्यंत महत्वपूर्ण घटक असून तो आनंदी-सहिष्णू-प्रज्ञावंत-निर्व्यसनी असावा, त्याचा चुंबकीय प्रभाव आपल्या विद्यार्थ्यांवर नित्य राहील. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तंत्रशिक्षण आवश्यक आहे. शिक्षणातून जीवनात संघर्ष करण्याची वृत्ती जोपासली जावी. असे मौलिक विचार स्वामीजींनी प्रतिपादन केले. संपूर्ण जीवन केवळ आणि केवळ देशोत्थानासाठी अर्पण केले. स्वामीजींचे जीवन सर्वांसाठी आदर्श, नित्य मार्गदर्शक आहे!आज एका मातेची आणि सुपुत्राची जयंती साजरी करतांना केवळ पुष्पहार घालून, वंदन करून चालणार नाही. आजही काळ तेव्हढाच खडतर आहे! नवनवी आव्हाने आपल्यासमोर आ वासून उभी आहेत. पैशापायी माणूस आपले सर्वस्व हरवून बसला आहे. आज शांत झोप लागत नाही! मोबाईल नावाच्या राक्षसाने घरदार गिळंकृत केलेय! गर्दीत सुद्धा माणूस वेड्यासारखा त्या डबड्यासोबत खेळतोय! एकटाच हसतोय! सगळीकडे वेडेच वेडे! हे चित्र महाभयंकर आहे! तेंव्हा आपल्या आदर्शांच्या जयंतीदिनी आपल्याला काहीतरी संकल्प करावे लागतील. मोबाईलपासून दूर राहून घराघरांत ग्रंथ वाचन करावे लागेल. सकाळ-सायंकाळ मोबाईल बंद ठेवून विश्वशांतीसाठी प्रार्थना म्हणावी लागेल! निरोगी-आनंदी जीवनासाठी सर्वांनाच व्यायाम-योगा-प्राणायाम-ध्यान करावेच लागेल! मोबाईल ऐवजी मैदानावर खेळ खेळावे लागतील. मूल्य शिक्षण घराघरांत रुजवावे लागेल. माणसामाणसात सुसंवाद वाढवावा लागेल. असे झाल्यास घराघरांत जिजाऊ आणि त्यानंतर शिवराय आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखे सुपुत्र जन्माला येतील, अन्यथा आणखी एक जयंतीचा इव्हेंट, बस्स!

**प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये**
**कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,सोनपेठ**
**जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो.९१५८०६४०६८**

सह्याद्रीचा राखणदार



# नाशिक येथे होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाकरिता शिवाजी महाविद्यालयातील राधिका दोरखंडेची निवड

## नेहरू युवा केंद्र संघटनेने केले आयोजन; चंद्रपूर जिल्ह्यातून तीन स्वयंसेवकांची निवड

**राजुरा । प्रतिनिधी**

नेहरू युवा केंद्र संघटना च्या वतीने २७ वी नॅशनल युथ फेस्टिवल राष्ट्रीय युवा महोत्सव दि.१२ ते १६ जानेवारी ला नाशिक येथे संपन्न होत असून त्याकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील तीन स्वयंसेवकांची निवड झालेली आहे. यामध्ये राजुरा येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनी राधिका अविनाश दोरखंडे आहे. तर इतर दोन विद्यार्थी निखिल भडके साहिल सोनवणे नाशिक येथे रवाना झाले आहे.





या शिबिरात देशभरातून जवळपास सात हजार विद्यार्थी सहभागी होणार आहे. नेहरू युवा केंद्र भारतामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अविरतपणे कार्य करीत आहे . युवा दिनाच्या निमित्ताने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरातून युवकांना मार्गदर्शन मिळणार असून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी हे शिबिर प्रेरणादायी ठरणार आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी निवड झाल्याबद्दल आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव अविनाश जाधव, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एम.वरकड, उप प्राचार्य डॉ.राजेश खेरानी, प्रा.बी.यू. बोर्डेवार, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अविनाश दोरखंडे , सचिव बादल बेले, प्रा.सुयोग साळवे यांनी अभिनंदन केले आहे.

# रामजन्मभूमी आंदोलनातील दोन ध्रुव तारे

रामजन्मभूमी आंदोलन सुरु असताना विविध आंदोलन, बैठकी, अभियान सतत सुरु राहात होते. या आंदोलनात सहभाग म्हणजे आर्थिक, शारीरिक, मानसिक सर्वच प्रकारे ताण राहात होता. अशावेळी अनेक मुर्ती अशा होत्या की त्यांनी कोणताही विचार न करता पूर्णपणे या चळवळीत स्वतःला झोकून दिले होते. अभियान आले की झोळी लटकवून निघाले.





यात पुलगावचे सोहनलालजी शुक्ला व नाचणगावचे श्रीकांत देशपांडे यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. आंदोलन, अभियान आले की साहित्य पोहोचवायला खेडोपाडी फिरावं लागे. वाहने नव्हतीच. बरेचदा सायकलचाच उपयोग होत होता. दोन्ही व्यक्ती पन्नाशीच्या पुढे होत्या. पण जिद्द विलक्षण होती. गावोगावी विटा घेऊन जायचे असो की जनजागृती अभियान सोहनलालजी जिद्दीने पेटलेले. श्री देशपांडे साथीला तयारच.संघाने आमच्यावर विश्वास ठेऊन जवाबदारी दिली, त्याला तडा आम्ही देणार नाही. कोणतेही काम पूर्णपणे फत्ते करणार म्हणजे करणार! हा निर्धार होता. यावेळी झालेले कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी त्यांनी केले. आज सोहनलालजी चे वय ९८ वर्षे आहे. मंदिर भव्य होत आहे. यातच त्यांना कृत्य कृत्य वाटतं आहे. श्री देशपांडे आज हयात नाही. पण पुलगाव परिसरात रामजन्मभूमी आंदोलनाची आठवण सोहनलालजी शुक्ला व श्रीकांतजी देशपांडे यांच्या नामोल्लेखाशिवाय पुर्ण होणे नाहीच.

**अविनाश भोपे**

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे देशाची प्रगती झाली : ना.बनसोडे

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्हाचे पालकमंत्री ना.संजय बनसोडे हे परभणी जिल्हा दौऱ्यावर आले असता सुजाता नगर येथील विहाराच्या प्रांगनात आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना व्यक्त केले बोलताना पुढे म्हणाले की ,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेमुळे एक चहा वाला देशाचा पंतप्रधान होऊ शकतो ,तर माझ्यासारखा एक बौद्ध कार्यकर्ता महाराष्ट्र राज्याचा कॅबिनेट मंत्री होतो ही एक आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. महाराष्ट्र सरकार हे इंदू मिलच्या जागेत बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा२५० फूट नव्हे तर ३५० फूट उंचीचा देशातील एकमेव पुतळा तयार करणार आहे, असे ते म्हणाले.



यांप्रसंगी विचार मंचावर पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, कार्याध्यक्ष अखिल भारतीय भिखु संघ पूर्णा, पूज्य भंते मुदितानंद थेरो, पूज्य भंते मोगलायन व पूज्य भंते पय्यावंश यांची प्रमुख उपस्थिती होती .तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा जिल्हा समन्वयक राजेश विटेकर, प्रताप भैय्या देशमुख , आनंद भरोसे,राजेश देशमुख यांची उपस्थिती होती या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो म्हणाले की, ना. संजय बनसोडे यांच्या रूपाने आपल्या बौद्ध समाजाचा पहिला पालकमंत्री या जिल्ह्याला मिळाला आहे. ते मराठवाड्याचे भूमिपुत्र असून तरुण व तडफदार व हुशार नेतृत्व आहे.ते आपल्या जिल्ह्याला नक्कीच विकासाचा निधी व न्याय देतील असे ते म्हणाले.पालकमंत्री म्हणून जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी त्यांचा दौरा होता. त्यांनी प्रथम सुजाता बुद्ध विहारात जाऊन तथागत गौतम बुद्ध चरणी पुष्प वाहिले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्रिवार अभिवादन केले. ना. संजय बनसोडे पालकमंत्री यांचे सुजाता बुद्ध विहार समितीच्या वतीने पुष्पहार घालून जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शहरातील बौद्ध उपासक व उपाशीका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या प्रसंगी बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष भगवान जगताप,गौतम मुंढे,गौतम साळवे,अशोक जोंधळे, अक्षय जगताप,अनिता सरोदे,विकास जोंधळे,रामराव तालेवार, झींझाडे, तुपसुंदर,प्रधान,रोहित साळवे, रगडे,प्रवीण वाघमारे आदींनी यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

# व्ही.पी.लाड,एस.डी.नेवरेकर यांची प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करा

## हत्तलवाडी ग्रामस्थांची मानवत तहसीलदार यांच्याकडे मागणी

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील मौ. हत्तलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत व्ही. पी. लाड यांची २०१९ पासून शाळेत नियुक्त आहे तर एस. डी. नेवरेकर हे जून २०२३ पासून नियुक्त आहेत परंतु चार वर्षांत हे शाळेत तीन ते चार महिने प्रत्येक्ष कार्यरत आहेत ते मानवत तहसील कार्यालय येथे प्रतिनियुक्तीवर आहेत त्यामुळे विदयार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत असून यांची प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करावी अशी मागणी हत्तलवाडी येथील सरपंच कृष्णा शिंदे पाटील , सर्जेराव शिंदे पाटील , माऊली शिंदे पाटील , सुनिल कापसे पाटील , त्र्यंबक शिंदे पाटील , प्रभाकर शिंदे पाटील , घनश्याम शिंदे पाटील, अरूण शिंदे पाटील, सुदर्शन शिंदे पाटील, परमेश्वर यमगर , यांच्या सह शेकडो ग्रामस्थांच्या वतीने मानवत तहसीलदार तथा पंचायत समिती गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे एका निवेदना द्वारे करण्यात आली असून त्यांची प्रति नियुक्ती रद्द न केल्यास शाळेस टाळे ठोकण्यात येईल असा इशारा ही ग्रामस्थांनी



या निवेदनाद्वारे दिला आहे. दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, दोन्ही शिक्षक हे मानवत तहसील कार्यालयात २०२३ पासून प्रतिनियुक्ती वर आहेत त्यामुळे गणित आणि विज्ञान अशा महत्वाचा विषयाचे विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत असून याचा गुणवत्तेवर मोठा परिणाम होत आहे तर शिक्षक उपलब्ध नसल्याने बरेच विद्यार्थी टी. सी. घेऊन जात आहेत व्ही. पी. लाड हे येथील इ.ङ.ज. आहेत मात्र गावात कधीच येत नाहीत आणि एस. डी. नेवरेकर हे मे २०२३ पासून नियुक्त आहेत तसेच त्यांना ऑक्टोबर २०२३ ते २२ जानेवारी २०२४ पर्यंत ई. व्ही. एम. व्ही. व्ही. पॅट जन जागृती साठी कार्यमुक्त आहेत तरी दोन्ही शिक्षकांना मानवत तहसील कार्यालया मधून तात्काळ कार्यमुक्त करावे व विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळावे अन्यथा १५ जानेवारी पासून शाळेला टाळे ठोकण्यात येईल अशा ईशारा हत्तलवाडी येथील शेकडो ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला असून निवेदनावर शेकडो हत्तलवाडी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# वसंत सहकारी कारखान्याचे साखर पुजन मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत

## शेतकरी मेळावा पैनगंगावरील बंधाऱ्याची निविदा प्रक्रिया गतीने करणार

## शेतकऱ्यांना गेल्या दिड वर्षात ४४ हजार कोटींची मदत–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे







**उमरखेड** –आपला देश शेतीप्रधान देश आहे. शेतकऱ्यांच्या घरात समाधान फुलले पाहिजे, त्यांचे अरिष्ट दुर झाले पाहिजे, या भावनेने राज्यात आपण काम करतो आहे. त्यामुळेच गेल्या दिड वर्षात वेगवेगळ्या माध्यमातून आपण राज्यातील शेतकऱ्यांना ४४ हजार कोटी रुपयांची मदत केली. शेतकऱ्यांना चांगली मदत करता यावी यासाठी प्रसंगी निकषाच्या बाहेर आपण निर्णय घेतले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

यवतमाळ जिल्ह्यातील पोफाळी येथील वसंत सहकारी साखर कारखान्याचे साखर पुजन व शेतकरी मेळावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास पालकमंत्री संजय राठोड, खा.भावना गवळी, खा.हेमंत पाटील, आ.नामदेव ससाने, आ.तान्हाजी मुरकुटे, भिमराव केराम, माजी खासदार शिवाजीराव माने, माजी आमदार राजेंद्र नजरधने, विजय खडसे, प्रकाश पाटील देवसरकर आदी उपस्थित होते.

नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी शेतकऱ्यांना चांगली मदत करता यावी यासाठी आपण निकषाच्या बाहेर जावून निर्णय घेतले. दोन हेक्टर मदतीची मर्यादा तीन हेक्टर केली. सततचा पाऊस नुकसानभरपाईच्या टप्प्यात आणला. केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून वर्षाला ६ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. याच धर्तीवर राज्य शासनाने पुन्हा ६ हजार रुपये देण्याचा निर्णय केला. त्यासाठी ५ हजार ७०० कोटींची तरतूद आपण केली. त्यातील १ हजार ८०० कोटी रुपयांचे वाटप देखील आपण केले. या योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना वर्षाला १२ हजार रुपये सहाय्य मिळत असल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे पुढे बोलतांना म्हणाले.वेगवेगळ्या कारणाने शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. अशावेळी त्यांच्या पिकाला हक्काचे संरक्षण असणे गरजेचे आहे. त्यामुळेच यावर्षापासून आपण पिकविमा योजना व्यापक प्रमाणावर राबवतो आहे. शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून या योजनेत सहभागी होता येत आहे. विम्याची रक्कम शासनाच्यावतीने भरली जाते. यावर्षी पहिल्यांदाच १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम देण्याचा आपण निर्णय घेतला. त्याचे वाटप देखील सुरु आहे. पोफाळी येथील आठ वर्षांपासून बंद साखर कारखाना सुरू झाल्याने २६ हजार सभासद शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. बंद कारखाना सुरु करण्याचे पुण्याचे काम खा.हेमंत पाटील यांनी केले आहे. शेतकऱ्यांसह परिसरातील तालुक्यांना निश्चितच त्याचा चांगला फायदा होणार आहे. राज्यातील आत्महत्या कमी करण्यासाठी आपण टास्क फोर्स स्थापन केला. शेतकऱ्यांनी देखील खचून न जाता आधुनिक, सेंद्रीय, प्रयोगशिल शेती केली पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले.बांबू अतिशय चांगले पिक आहे. मनरेगात आपण बांबूचा समावेश केला. यासाठी हेक्टरी ७ लाख रुपये दिले जाते. बांबू चांगला जोडधंदा असल्याने परिसरात त्याचे क्लस्टर करता येईल का? यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. पैनगंगा नदीवर मंजूर ६ बंधाऱ्यांचे काम तातडीने पुर्ण होण्यासाठी त्याची निविदा प्रक्रिया जलदगतीने करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.प्रास्ताविक भाषणात खा.हेमंत पाटील म्हणाले, ५० वर्षांपूर्वी वसंतराव नाईक यांनी परिसरातील शेतकऱ्यांसाठी साखर कारखाना सुरु केला. आज हा कारखाना सुरु होतांना अतिशय आनंद होत आहे. पैनगंगा नदीवर मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी ६ बंधारे मंजूर केले. या बंधाऱ्यांचे काम लवकर होण्यासाठी निविदा प्रक्रिया गतीने होणे आवश्यक आहे. बंधाऱ्यामुळे परिसरात ७५ हजार हेक्टर क्षेत्राला लाभ होणार असल्याचे खा.पाटील म्हणाले.आ.नामदेव ससाने यांनी देखील मनोगत व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्याहस्ते कृत्रिम अंग वाटपाचे उद्घाटन तसेच मुख्यमंत्री आपल्या दारी अंतर्गत मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाच्या सौजन्याने तयार करण्यात आलेल्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जर्मनीमध्येही महाराष्ट्र वनविभागाचा डंका वाजेल-वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

## वन,वनेत्तर क्षेत्र पुर्नसंचयन,जतन आणि सरंक्षणार्थ भारत-जर्मनी द्विपक्षीय सहकार्य करार





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने गत काळात वनमंत्री म्हणून ५० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम महाराष्ट्रात राबविण्यात आला. ही केवळ एक योजना नव्हती तर झाडे कापणा-या हातांपेक्षा झाडे लावणारे हात निर्माण व्हावे,हा उदात्त हेतु त्यामागे होता. वृक्षलागवडीच्या या उपक्रमातून राज्यात २५५० चौ.कि.मी.चे हरितआच्छादन वाढले. महाराष्ट्राचा वन विभाग नेहमीच अभिनव उपक्रम राबविण्यात आघाडीवर राहिला आहे. आताही भारत-जर्मनी द्विपक्षीय सहकार्य करार भारतातील चार राज्यात राबविण्यात येत असला तरी महाराष्ट्र यात अव्वल राहील व आपल्या वनविभागाचा डंका जर्मनीमध्येसुध्दा वाजेल,अशी ग्वाही राज्याचे वनमंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

वन अकादमी येथे भारत-जर्मनी द्विपक्षीय सहकार्य प्रकल्पांतर्गत वन,वनेत्तर क्षेत्र पुर्नसंचयन,जतन आणि संरक्षणार्थ कार्यक्रमाचा शुभारंभ करतांना वनमंत्री श्री. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी मंचावर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) शैलेश टेंभुर्णीकर,प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता,कॅम्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शोभिता विश्वास,या प्रकल्पाचे जर्मनीतील संचालक डॉ. अलेजांद्रो वॉन बेर्ट्रांब,वन अकादमीचे संचालक एम.एस.रेड्डी,डॉ. कुंदन आदी उपस्थित होते.महाराष्ट्र-जर्मनी यांच्यात द्विपक्षीय सहकार्य करार झाल्याचे घोषित करून वनमंत्री मुनगंटीवार म्हणाले,महाराष्ट्रात पर्यावरण विषयक संशोधन व प्रशिक्षणाच्या संधी वाढविण्यासाठी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन संस्था यांच्या सहकार्याने करण्यात आलेल्या या कराराची अंमलबजावणी उत्तम व्हायला पाहिजे. चंद्रपूर येथील वन अकादमी ही देशातील उत्कृष्ट प्रशिक्षण संस्था आहे. याच संस्थेत आज महत्वाचा करार होत असून अतिशय शास्त्रशुध्द नियोजन आणि प्रशिक्षण या वनअकादमीत व्हावे. जगातील १९३ देशांपैकी १४ देशामध्ये वाघ आहे त्यातील ६५ टक्के वाघ भारतात आहे,आणि महाराष्ट्रात सर्वाधिक वाघ चंद्रपूर जिल्ह्यामध्ये असल्यामुळे येथून पराक्रमी मानसिकता घेऊन जावी. उत्तमातील उत्तम काम करून या कराराला पूर्णपणे यशस्वी करू तसेच महाराष्ट्राच्या वनविभागाचा झेंडा जर्मनीमध्ये रोवू,अशी ग्वाही वनमंत्री मुनगंटीवार यांनी दिली.पुढे ते म्हणाले,निव्वळ धनाने काम होत नाही तर त्यासाठी हिरवे मनसुध्दा लागते. या कराराच्या माध्यमातून उत्कृष्ट अंमलबजावणी करण्याचा संकल्प करा. पर्यावरणाचा-हास हे आज जगातील सर्वात मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. संपूर्ण ब्रम्हांडात केवळ पृथ्वीवर सजीवसृष्टी आहे. मात्र आज मनुष्याकडूनच पर्यावरणाची हानी होत आहे. पर्यावरणीय बदल,ग्लोबल वॉर्मिंग हे महाकाय राक्षस आपल्यासमोर उभे ठाकले आहेत. त्यामुळे वनांच्या संरक्षणाची सर्वाधिक जबाबदारी वन अधिका-यांवर आहे. आई आणि वनराईच्या सेवेचे मुल्यांकन सर्वाधिक असून मातेचे तसेच मातीचेही कर्ज आपल्यावर आहे. त्यामुळे आहे त्या जमिनीचे संगोपन,संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागेल,असे आवाहन त्यांनी केले.यावेळी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते महाराष्ट्र-जर्मनी द्विपक्षीय सहकार्य कराराचे डीजीटल पध्दतीने उद्घाटन,सौर उर्जा कुंपन योजनेचे उद्घाटन तसेच माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.प्रास्ताविकात वनबलप्रमुख म्हणाले,जागतिक पातळीवर वनांचे महत्व वाढले आहे. वातावरणात ६४ टक्के कार्बन डॉयऑक्साईड असून त्यामुळे तापमानात वाढ होत आहे. या कराराच्या माध्यमातून वन,वनेत्तर क्षेत्र पुर्नसंचयन,जतन आणि संरक्षण करून हवेतील कॉर्बन डॉयऑक्साईडचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच जमिनीचा पोत सुधारणे,शेती,वनजमीन आणि पाणी साठा असलेल्या जमिनीचा विकास करणे आणि स्थानिक लोकांना उपजिविकेचे साधन म्हणून प्रशिक्षित करणे,हा या कार्यक्रमाचा हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.यांना मिळाला सौर उर्जा कुंपनाचा लाभ : उध्दवराम पाटणकर,रविंद्र गावडे,मारोती तायडे,सुरेश कुईटे,सचिन जमदाळे,दिवांजी गिरडकर,आशा गिरडकर,दिलीप भोयर,गणपती उपरे,विनय डोंगरे यांना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सौर उर्जा कुंपण वाटपाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

### १० जिल्ह्यातील ग्रामस्थांना लाभ

**वने,वनक्षेत्र पुनर्संचयित व जतन आणि संरक्षित करण्यासाठी रिकॅप फॉन एन.डी.सी. प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील चंद्रपूर,यवतमाळ,गडचिरोली,छत्रपती संभाजीनगर,अहमदनगर,पुणे,नाशिक,जळगाव,रत्नागिरी आणि नंदुरबार या १० जिल्ह्यांतील ९४२७८ हेक्टर वन व वनेत्तर क्षेत्राचे पुनर्संचयित प्रस्तावित आहे. त्यामुळे ११ लक्ष ५७ हजार १८९ ग्रामस्थांना लाभ होणार आहे.**

# दंडाची रक्कम जुळवाजुळव करण्यासाठी गेला आणि अपघातात जीव गमवला

**मूल । प्रतिनिधी**



चार दिवसापूर्वी तहसील कार्यालयातील एका कर्मचाऱ्याने राजू भावराव भेंडारे (३८) राहणार चिचाळा, यांच्या मालकीचा रेती भरलेला ट्रॅक्टर पकडला.रेती तस्करी करीत असल्याने त्याचे ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आले.शासन निर्णयाप्रमाणे ट्रॅक्टर सोडविण्याकरिता एक लाख २५ हजाराचा दंड आकारण्यात आला. एवढी मोठी रक्कम देणे राजूला शक्य झाले नाही. ट्रॅक्टर सोडविण्याकरिता एक लाख २५ हजार रुपये दंडाची रक्कम जुळवाजुळव करण्याकरिता तो मित्रांकडे नातेवाईकांकडे फेर्या मारीत होता.अशाच एका नातेवाईकाकडे पैसे आणण्याकरिता जात असताना, चंद्रपूर रोडवर नागाळा नजीक राजू चा अपघात झाला आणि त्यात तो दुर्दैवाने मृत पावला.राजू भेंडारे सोबत आणखी एक त्याचा साथीदार होता,तो गंभीर जखमी झाला असून त्याला उपचाराकरिता चंद्रपूर येथे नेण्यात आले आहे.११ जानेवारीला सकाळी त्यांनी अनेक मित्रांकडे दंड भरण्याकरिता काही रक्कमेची मदत करावी म्हणून विनंती करीत होता.राजू भेंडारे, यांना दोन अपत्य असून, घरची शेती विकून त्यांनी ट्रॅक्टर घेतली होती हे विशेष.

# आनंद निकेतन विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेची रासेयो शिबिराला भेट

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती आनंदवन व्दारा संचालित आनंद निकेतन महविद्यालयाच्या वतीने तुमगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मृणाल काळे व शिबिर प्रमुख प्रा. मोक्षदा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाचे सुरवात दिपप्रज्वलन करून करण्यात आले.या शिबिरात महाराष्ट्रातील वर्धा येथील सुप्रसिद्ध लोकप्रिय सप्तखंजेरीवादक जेष्ठ किर्तनकार इंजि. भाऊ थुटे यांचा समाजप्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. यात व्यसनमुक्ती, मतदान जागृती व संतांचे विचार व्यक्त केले. यावेळी महविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष देवानंद अलोने, कोषाध्यक्ष कमलाकर डुकरे, महासंघ प्रतिनिधी सुनील चिमुरकर, सचिव सचिन नक्षिणे,संघटक भुपेश साखरे, संतोष गुंतीवार, सहसचिव प्रफुल थुटे, निखिल डुकरे, संकेत कायरकर व सर्व प्राध्यापक वृंद, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रवंदनाने करण्यात आली.



# तलाठी भरतीचा निकाल,पी.एचडी फेलोशिप सीईटी पेपर फुटीच्या घटना निंदनीय : अभाविप

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अभाविपचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**वर्धा । प्रतिनिधी**

राज्यातील शैक्षणिक स्थिती अत्यंत निंदनीय असल्याचे सांगत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने वर्धा येथील जिल्हाधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे .

सारथी महाज्योती व बार्टी यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या पी. एचडी फेलोशिपच्या सीईटी परीक्षेची पेपर फुटी तसेच नुकताच जाहीर झालेला तलाठी भरतीचा आगळा-वेगळा निकाल ज्यामध्ये एकूण २०० गुणांच्या परीक्षेत २०० पेक्षा अधिक गुण देत विद्यार्थ्यांची खिल्ली उडवली असून अत्यंत निंदनीय असल्याचे मत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने नमूद केले आहे. राज्य सरकारच्या सरळ सेवा महसूल विभागांतर्गत १७ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ दरम्यान टी. सी. एस. मार्फत तलाठी भरती परीक्षा घेण्यात आली होती. ८ लाखापेक्षा अधिक उमेदवारांनी ही परीक्षा दिली असून या परीक्षेत गैरप्रकार होण्याचा आरोप स्वतः परीक्षा समन्वय समिती आणि पोलीस विभागाने केला आहे. सामान्यीकरणाच्या पद्धतीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे गुण निश्चित गुणांपेक्षा अधिक असल्याचा आरोप उर्वरित उमेदवारांद्वारे करण्यात आला आहे. या सोबतच बुधवारी सारथी व बार्टी यांच्याद्वारे झालेल्या पी. एचडी फेलोशिप च्या सीईटी परीक्षेच्या पेपर फुटीची निंदनीय घटना समोर आली. त्यामुळे याचे गांभीर्य महाराष्ट्र शासनाने घ्यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात अभाविप वर्धा जिल्हा संयोजक वैभव राऊत, नगरमंत्री हर्ष वानखेडे, नगर सहमंत्री दिव्यानी पांडे ,साहिल इंगळे ,समुद्रपूर भाग संयोजक तेजस उमाटे ,वर्धा शहराचे विधी विद्यार्थी संयोजक मृणाल नेटके, नीरज मजेठिया ,संजय पोपटकर ,बादल लोखंडे ,विद्यार्थी संजय बन्सोड व आदित्य तळवेकर उपस्थित होते.

मागील काही वर्षांपासून परीक्षा प्रक्रियांमध्ये वारंवार घोळ होताना दिसून येत आहे. राज्य सरकारच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व्यर्थ होत असून त्यांचे आर्थिक नुकसान सुद्धा होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण तयार होत असून शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासार्हता धोक्यात आली आहे ,याची गंभीर दखल प्रशासनाने घ्यावी.

**– वैभव राऊत,**
**जिल्हा संयोजक, अभाविप वर्धा.**

परीक्षेत वारंवार गैरप्रकार होत असल्याने विद्यार्थ्यांच वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांची खिल्ली उडवत असल्याचा भास आम्हाला होत आहे.

**– संज्योत बन्सोड, संतप्त विद्यार्थी**

# गोंडवाना विद्यापीठात 'विसडम ऑफ माईंड' कार्यशाळेचे उद्घाटन




**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभागाच्या वतीने 'विसडम ऑफ माईंड' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे , मुख्य मार्गदर्शक म्हणून जितेंदर कुमार ,अधिष्ठाता मानव विज्ञान विद्या शाखा डॉ. चंद्रमौली, मराठी विभागाचे समन्वयक डॉ. श्याम खंडारे , योगेश श्रावण यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून जितेंदर कुमार यांनी

बेसिक ऑफ मेमरी, स्मृतीशास्त्र: मेमरी एड्स तयार करणे,मेमरी प्लेसेस तयार करणे आणि वापरणे,एकाग्रता तंत्र,माइंडफुलनेस आणि ध्यान तंत्र,लक्ष केंद्रित करण्यासाठी व्यायाम, मेमरी खेळ आणि क्रियाकलाप , जटिल माहितीसाठी प्रगत स्मृतीशास्त्र,मेमरी वर्धित करण्यासाठी व्हिज्युअलायझेशन तंत्र,सुधारित एकाग्रतेसाठी वेगवान वाचन,स्वतःची मेमरी कशी एम्प्रूव करायची या बाबींची विस्तृत माहिती देऊन त्यांनी अनेक उदाहरण देत या विषयावर प्रकाश टाकला .यावेळी कुलगुरु डॉ.प्रशांत बोकारे म्हणाले, ही कार्यशाळा प्रत्येकाला त्याचे मानसिक आरोग्य सुदृढ करण्यासाठी खूप मदतीची आहे. जर संपूर्ण एकाग्रतेने याचा लाभ घेतला तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उपयोगी पडेल अशी महत्वपूर्ण माहिती यात मिळेल. मेंदूची क्रियाशीलता वाढविणारी ही कार्यशाळा आहे.आपण सद्यस्थितीत जे काही आहोत. ते आपले आधी केलेले कार्य आहे .आपण जो विचार करतो तेच आपण बनतो. इतरांवर दोषारोपण करण्यापेक्षा आपण कसे चांगले बनू यासाठीचे हे ट्रेंनिग आहे. असे ते म्हणाले.या कार्यशाळेचे प्रास्ताविक मराठी विभागाच्या स. प्रा. डॉ. सविता सादमवार , संचालन आणि आभार जनसंवाद विभागाचे स. प्रा. सरफराज अन्सारी यांनी मानले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .